# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 01 September 2024

## Time: 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक: ०१ सप्टेंबर २०२४ दुपारी १.०० वा.

****

व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या किंमतीत ३९ रुपयांची वाढ झाली आहे. इंडियन ऑईलच्या संकेतस्थळावर ही माहिती देण्यात आली. याआधी गेल्या महिन्यात ८ रुपये ५० पैशांनी एलपीजी गॅसच्या किंमती वाढवण्यात आल्या होत्या, तर जुलैमध्ये गॅस सिलिंडरचे दर ३० रुपयांनी कमी झाले होते.

****

महाविकास आघाडीतर्फे मुंबईतल्या हुतात्मा स्मारक ते गेटवे ऑफ इंडिया या परिसरादरम्यान ‘जोडे मारो’ आंदोलन केलं जात आहे. या आंदोलनात महाविकास आघाडीचे नेते सहभागी झाले आहेत. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवणच्या राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा कोसळण्याच्या घटनेमुळं हे आंदोलन केलं जात आहे. तर महाविकास आघाडीच्या विरोधात महायुतीनंही आंदोलन सुरु केलं आहे.

****

दरम्यान, राजकोट किल्ल्यावर घाईघाईनं शिवाजी महाराजांचा पुतळा भ्रष्टाचार करून उभारण्याची गरज नव्हती, असं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आंदोलनादरम्यान म्हटलं आहे. मालवणचा प्रकार हा महाराष्ट्राच्या आत्म्याचा अपमान असल्याचं सांगत त्यांनी राज्य सरकारवर टीका केली. तर ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी मालवणच्या प्रकरणात भ्रष्टाचार झाला म्हणून पुतळा कोसळल्याचा प्रकार घडला, असा आरोप यावेळी केला.

दरम्यान, महाविकास आघाडीचं हे आंदोलन पूर्णपणे राजकीय असून काँग्रेसनेच शिवाजी महाराजांचा इंदिरा गांधी यांच्या काळापासून अपमान केला आहे, असा आरोप उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपूर मध्ये प्रसारमाध्यमांशी बोलताना केला.

****

यंत्रांसाठी लागणाऱ्या टिकणाऱ्या इलेक्ट्रॉनिक साहित्याची निर्मिती करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी केंद्रसरकार देशभरात नवीन योजना आणणार आहे. इलेक्ट्रॉनिक आणि सूचना प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल नवी दिल्लीत ही माहिती दिली. भारतात वापरात असलेले ९९ टक्क्यांहून अधिक मोबाईल फोन देशातच तयार करण्यात येत असल्याचं त्यांनी सांगितलं. ॲपल ही कंपनी या वर्षी आपला नवा मोबाईल भारतात निर्माण करणार असल्याचंही ते म्हणाले.

****

उद्या साजरा होणाऱ्या पोळा या सणाच्या पार्श्वभूमीवर बैलांना सजवण्यासाठी लागणारे झुल, बेगड, घुंगरू या साहित्यानं राज्यातल्या बाजारपेठा सजल्या आहेत. कृषी संस्कृतीशी आपली नाळ सांगणाऱ्या या सणासाठी वाशिम शहरातही आज बाजार भरला आहे.

****

राज्यातील भटक्या जमाती क- प्रवर्गातील धनगर समाजातील केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतलेल्या मात्र शासकीय वसतिगृहामध्ये प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी "पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम् योजना" राबवण्यास राज्यशासनानं मान्यता दिली आहे.

याअंतर्गत क प्रवर्गातल्या धनगर समाजातल्या विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न राष्ट्रीयकृत बँक खात्यामध्ये भोजन, निवास तसंच इतर शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन घेण्यासाठी ३८ हजार ते ६० हजार पर्यंतची रक्कम थेट वितरित करण्यात येईल. इयत्ता बारावीत किमान ६० टक्के गुण असणारे क प्रवर्गातले धनगर समाजातले विद्यार्थी या योजनेसाठी पात्र असतील.

****

आकाशवाणी बीड केंद्रातील अभियांत्रिकी विभागाचे वरिष्ठ अभियांत्रिकी सहाय्यक बळीराम वाकळे काल सेवानिवृत्त झाले, बळीराम वाकळे यांनी आपल्या शासकीय सेवेत छत्तीसगढ राज्यातल्या  चिरीमिरी दूरदर्शन केंद्र, आकाशवाणी परभणी, नांदेड आणि बीड केंद्र इथं विविध पदांवर काम केलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात पैठण इथल्या जायकवाडी धरणाचा साठा ८४ टक्क्यांहून अधिक झाला आहे. सध्या या धरणात १६ हजार १६ दशलक्ष घनमीटर या वेगाने पाण्याची  आवक सुरु आहे.

****

नांदेड जिल्ह्यात अनेक ठिकाणी गेल्या २४ तासांपासून  दमदार पाऊस सुरू आहे. जिल्ह्यातील २६ मंडळामध्ये अतिवृष्टी झाली असून नागरिकांनी आणि यंत्रणांनी सतर्क राहावं, अशा सुचना जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी दिल्या आहेत.

गेल्या चोवीस तासांत जिल्ह्यातील २६ मंडळांत ६५ मिमी पेक्षा अधिक पाऊस झाला आहे. त्यामुळं नदी नाल्यांच्या पाणीपात्रामध्ये वाढ झाली आहे. जिल्ह्यात हदगाव तालुक्यातील हदगाव महसूल मंडळासह  किनवट, माहूर आणि हिमायतनगर तालुक्यातल्या अनेक गावात ,मुदखेड तालुक्यातील मुदखेड इथे तर अर्धापुर तालुक्यातील अर्धापूर महसूल मंडळात अतिवृष्टीची नोंद झाली आहे.

****

सोलापूर जिल्ह्यात काल रात्रीपासून पावसाची संततधार सुरू आहे. सतत पडणाऱ्या पावसामुळं खरिपाच्या पिकांना जिल्ह्यात धोका निर्माण झाला आहे.

****